# श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना

◆ **उद्देश :**

राज्यातील ६५ व ६५ वर्षावरील निराधार वृध्द व्यक्तींना मासिक निवृत्ती वेतन देण्याच्या मुळ हेतूने श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येते.

६५ व ६५ वर्षावरील दारिद्रयरेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार स्त्री व पुरुषांच्या केंद्र शासनाच्या **इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमधुन प्रतिमाह रुपये २००/-** निवृत्तीवेतन देण्यात येते. या योजनेस पूरक असलेल्या राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून लाभार्थ्यांस प्रतिमास **रुपये ४००/-** इतके निवृत्तीवेतन देण्यात येते. म्हणजेच लाभार्थ्यांस **प्रतिमास रुपये ६००/-** इतके निवृत्ती वेतन देय आहे. याला **श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट -अ म्हणतात.**

**श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट — ब** ही योजना, जे खरोखर गरजू निराधार वृध्द आहेत. मात्र दारिद्रय रेषेखालील यादीमध्ये ज्यांची नोंद नाही व त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २१,०००/- पर्यंत असेल तर अशा वृध्दास संपूर्ण रुपये ६००/- इतके निवृत्ती वेतन **श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट - ब मधून देय असेल.**

मध्यंतरी " मी आईवडीलांस सांभाळत नाही " एवढयाच आशयाच्या प्रतिज्ञापत्रावर या योजनेचा गैरलाभ घेण्याचा प्रयत्न झाला. समाजातील वृध्दांच्या बाबतीत काळजी घेण्याची समाजाची मानसिकता कायम रहावी म्हणून शासनाने आईवडील सांभाळ कायदा सन २०१० मध्ये देशभर लागू केला आहे. म्हणून हया योजनांचा गैरलाभ घेतला जाणार नाही. यासाठी आपण सर्वांनी दक्ष असेण आवश्यक आहे.

◆ **पात्रतेचे अन्य निकष, अटी व शर्ती :**

किमान १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक , वय ६५ व ६५ वर्षापेक्षा आधिक कुटुंबाचे नाव ग्रामीण / शहारी भागाच्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे किंवा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २१,०००/- पर्यंत असावे.

◆ **आवश्यक कागदपत्रे :**

**१) वयाचा दाखला -**

ग्रामपंचायतीच्या /नगरपालिकेच्या/ महानगरपालिकेच्या जन्मनोंदवहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत, शाळा सोडल्याचा दाखला, शिधापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमुद केलेल्या वयाचा उतारा

किंवा ग्रामीण/ नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक यांचा किंवा तत्सम वरील दर्जाच्या शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला.

**२) उत्पन्नाचा दाखला :-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती/ कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा किंवा तहसिलदार किंवा उपविभागीय अधिकारी यांनी दिलेला दाखला ( अर्जदाराकडून रुपये ५ च्या Cort Fee Stamp वर प्राप्त झालेल्या अर्जानुसार )

**३) रहिवाशी दाखला :**

ग्रामसेवक /तलाठी /मंडळ निरीक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवासी दाखलाही ग्राहय धरण्यात येईल.

४) शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही.

५) संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षाचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्या निवृत्तीवेजन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनेच्या निकषांच्या अधिन राहून सामावून घेतले जाईल.

६) एखादया विशिष्ट प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या व विहित अटी पूर्ण करीत असलेल्या अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचे अधिकार शासनालासुध्दा राहतील.